# शिक्षणमंत्र्यांचे अभिनंदन

माननीय मंत्रीमहोदय

सप्रेम नमस्कार,

सिब्बलसाहेब, आपले हार्दिक अभिनंदन !

तुम्ही दिला माहितीच्या परीक्षेला नकार, मी तर देते माहितीलाच नकार. तुम्ही खरे द्रष्टे दिसता. माहितीनी किती तरूणांचं आयुष्य उद्ध्वस्त झालं ते किमान थोड लक्षात तरी आलं. अगदी जीवन नकोसं केल या महितीच्या परीक्षांनी. फक्त माहिती डोक्यात कोंबून, खूप शिकवण्या लावून, घोटून घोटून ९८% गुण मिळवायचे व सर्वांनी त्या विद्यार्थ्याला डोक्यावर घ्यायचं व त्याच्यासाठी सर्व कॉलेज व कंपन्यांनी ' रेड कार्पेट' अंथरायचं हे कुठेतरी थांबायलाच हवं. या ९८% वाल्या विद्यार्थांचा पुढच्या आयुष्यातला प्रवास व एका सुमार ५० % किंवा अगदी नापास झालेल्या विद्यार्थ्यांचा पुढचा प्रवास फारसा वेगळा नसतोच. म्हणूनच वाटतं ''९० +'' सिन्ड्रोमचं स्तोम बंद झालच पाहिजे. तुम्ही हे ओळखलं, तुम्हाला मी सर्व नापास झालेल्या व ५० % मार्कस् मिळवणाऱ्यांच्या वतीने धन्यवाद देते.

कपीलसाहेब तुम्ही एवढं केलत, आणखी एक विनंती . माहिती व ज्ञान यातला फरक समजून सर्वांना ज्ञानाकडे वळवा. सगळ्यांची एक मोठी चूक होते आहे. सगळे महितीलाच ज्ञान समजतात. तेव्हा सर्व विद्यार्थांना ज्ञान कसं व कुठे मिळेल ते सांगा व ज्ञान मिळविण्यासाठी सर्व भारतभर वेगळे अभियान चालवा. यासाठी वेगळे इन्फ्रास्ट्रक्चर, पायाभूत व्यवस्थेच जाळ लागेल ते उभारा आणि आपल्या जुन्याच अस्सल पंरपरागत ज्ञानमार्गावरून विद्यार्थांना सुरूवातीला हात धरून चालवा. जिथे म्हणून माहिती विद्यार्थी घेणार आहेत, त्याना सांगा हे फोलपट आहे, फेकून दे. खूप कठीण आहे हा सगळा विचार रूजायला पण सुरूवात तर होऊ द्या.

विद्यार्थी आयुष्याची २५ वर्ष शिकतात. मग ते समाजाचं ऋण केव्हा फेडणार ? डॉक्टर १२ वी नंतर १० वर्ष शिकतच राहतात. आजकाल तर लोक

२०-२० वर्ष अनेक पदव्या गोळा करतात. पण त्यांना  हिंदीत पढतमूर्ख म्हणतात. आपल्या एकएक पदवीचा अवधी ४ ते ५ वर्ष. अबब ! या पेक्षा त्यांना एक वर्ष फक्त ज्ञान घेऊ द्या .  बघा ह्या पदव्यांचे वर्ष खूप कमी होतील.  फार थोड्या अवधीत विद्यार्थी आपलं व्यावसायिक शिक्षण पूर्ण करतील. ज्ञान घेतल्यानंतर माहिती कोणची, कुठून कशी, किती, कितीकाळ  घ्यायची हे विद्यार्थांना ठरवू द्या.  सरकारनी नको सांगायला की तू १० वर्ष शिक की  ५ वर्ष शिक. विद्यार्थांना स्वतंत्र व स्वावलंबी बनू द्या. ज्ञान तुम्ही द्या व माहितीच स्वातंत्र्य विद्यार्थांनां द्या.  क्रांती घडेल. ह्या ज्ञानी तरूणांच्या परीक्षा तुम्हाला घ्याव्याच लागणार नाहीत. ते स्वत:च देतील. हे ज्ञानी तरूण अल्पावधीतच या गरीब व गलिच्छ भारताला लखलखत्या वैभवाच्या  शिखरावर नेतील. तेव्हा भारताला ज्ञानी बनवा, कारकून नव्हे.

एका छोट्याशा शाळेची  संचालिका आपले विचार तुमच्यापर्यंत एका खुल्या पत्राव्दारे पोहोचवते आहे. वाचाल अशी विनंती करते व माझ्या या पत्राची पोच द्याल असा आग्रह पण!

इंग्रजीमधला एक परिच्छेद देत आहे. मला काय म्हणायचं आहे ते तुम्हाला नक्की कळेल. Lord Macaulay in his famous " Minutes on Indian Education" on February 2, 1835 said ", I have traveled across the length & breadth of India and I have not seen one person  who is a begger, who is a thief. Such wealth I have seen in the country.  such high moral values, people of  such caliber, that I do not think we would ever conquer this country unless we break the **backbone of this nation, which is her spiritual & culture heritage** and therefore I propose that we replace her old and ancient education system, her culture, for  Indians think  that  foreign and English is good and greater than own. they will lose their self-esteem, their native culture and they  will become what we want them a truly dominated nation "

ह्या परिच्छेदाचा मतीतार्थ एवढाच निघतो की लॉड मॅक्युले नी १८३५ सालीच ओळखल होत. भारत ध्यानी आहे म्हणूनच ज्ञानी आहे.

कारण – 'ध्यानी तो ज्ञानी'

धन्यवाद !

लोकमत ता. २४.०८.२००९